# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पुणे महानगरपालिका हद्दीतील बाणेर पासून सुरु होणाऱ्या मुंबई ते बंगलोर राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाबाबत

**(१) २२२१ (२२-१२-२०१४). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका हद्दीतील गणराज मंगल कार्यालय बाणेर पासून ते मुंबई ते बंगलोर राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा सर्व्हीस रोड पर्यंतच्या रस्त्याची रुंदी डी.पी.प्लॅनमध्ये १८ मीटर पर्यंत नियोजित दाखवलेली आहे, या रस्याच्या रुंदीकरणामुळे ज्या घरांचे नुकसान होणार आहे अशा बाधीत घरमालकांनी रस्त्याची रुंदी १८ मीटर पर्यंत करण्यास विरोध डी.पी.प्लॅन समितीच्या सुनावणी दरम्यान दर्शविला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीडॅक या संस्थेने डी.पी. प्लॅनचे नियोजन कोणत्या तांत्रिक व वस्तुस्थितीचा अभ्यास करुन या रस्त्यांची रुंदी १८ मीटर पर्यंत करावी असे सुचविले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्याच्या डावीकडील छोट्या क्रॉसलेन्स या डेड रोड आहेत व त्या कुठल्याही मोठ्या रस्त्याला जोडल्या गेलेल्या नाहीत त्यामुळे या भागात राहणाऱ्या नागरिकांच्या सांगण्यानुसार हा रस्त्या १८ मीटर झाल्यास येथील रहिवाशांच्या घराचा भाग रस्त्यात जाणार असल्याने सदर रस्ता १२ मीटरपर्यंत करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) होय, पुणे शहराच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेमध्ये बाणेर या प्रभागामधील प्रस्तावित १८ मी. रस्त्याबाबत एक हरकत प्राप्त झाली होती.

(२) प्रस्तावित १८ मी. रस्त्याच्या रुंदीबाबत सीडॅक संस्थेने कोणताही तांत्रिक व वस्तुस्थितीचा अहवाल केलेला नाही.

(३) पुणे शहराच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेमधील नियोजन गट क्र. १ बाणेर बालेवाडी मधील प्रस्तावित विकास योजना रस्त्यांच्या प्रस्तावांना शासनाने दि. १८/०९/२००८ रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे सदर रस्ता विकास योजनेमध्ये कायम आहे. सदर रस्त्याची रुंद कमी करण्याबाबत महानगरपालिकेकडून कोणताही फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला नाही.

---

**पुज्य चालिया साहेब मंदीर उल्हासनगर या मंदिराच्या परिसराचा विकास करणे**

**(२) २४५१ (२३-१२-२०१४). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुज्य चालिया साहेब मंदीर उल्हासनगर या मंदिराच्या परिसराचा तीर्थ क्षेत्र विकास योजनेअंतर्गत विकसीत करण्याचा प्रस्ताव उल्हासनगर महानगरपालिकेने शासनाकडे पाठवला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने हे काम लवकरात लवकरात लवकर पुर्ण व्हावे याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबास कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.

(२) सदर प्रस्ताव तपासणी सुची प्रमाणे अदयावत करुन विभागीय आयुक्त, कोकण यांचे मार्फत शासनास सादर करण्याबाबत दि.१ जुलै, २०१४ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी ठाणे यांना कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**जालना नगरपरिषदेने तीनपट वाढीव पाणीपट्टीबाबत नागरीकांना नोटीसा बजावल्याबाबत**

**(३) ३०८९ (२३-१२-२०१४). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना नगरपरिषदेने तीनपट वाढीव पाणीपट्टीची घोषणा करुन वाढीव पाणीपट्टीसाठी नागरीकांना नोटीसा बजावण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप पाणीपुरवठयाचे नियोजन महानगरपालिकेकडून झाले नसून अंतर्गत जलवाहिनीसुध्दा बसविलेल्या नाहीत तरीसूध्दा तीनपट वाढीवचा बोजामुळे नागरीकांत असंतोष आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढीव पाणीपट्टी रद्द करुन नागरीकांना पुरेसे पाणी देण्याबाबत शासनाने काय उपाययोजना केली अथवा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.
(२) जायकवाडी जालना पाणीपुरवठा योजने अंतर्गत जालना शहरास पाणी पुरवठा सुरु झालेला असून न.पा. हद्दीतील अस्तित्वात असलेल्या वितरण व्यवस्थेद्वारे मुबलक पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे नागरीकात असंतोष नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईच्या विकासासाठी उपयुक्त ठरणाऱ्या बेलापूर-सीवूड-उरण हा लोकल प्रकल्प मध्य रेल्वे आणि सिडकोने एकत्रितपणे राबविण्याचा घेतलेला निर्णय**

**(४) ४५१० (२३-१२-२०१४). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईच्या विकासासाठी उपयुक्त ठरणाऱ्या बेलापूर-सीवूड-उरण हा लोकल प्रकल्प मध्य रेल्वे आणि सिडकोने एकत्रितपणे राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या १८०३ कोटी रूपयांच्या प्रकल्पात मध्य रेल्वेचा वाटा एक तृतीयांश तर सिडकोचा दोन तृतीयांश इतका सहभाग आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मध्य रेल्वे आणि सिडकोने एकत्रितपणे हाती घेतलेल्या या प्रकल्पात कराराप्रमाणे सिडकोकडून अपेक्षित असणारी रक्कम यावर्षी देण्यात आली नसल्याची बाब दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिडकोने याप्रकल्पासाठी आपल्या वाट्याची रक्कम न देण्याची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१), (२) व (३) होय.
(४) सुधारीत अंदाजपत्रकाप्रमाणे बेलापूर-सीवूड्स-उरण रेल्वे प्रकल्पासाठी एकूण खर्च रु. १८१४.५० कोटी अपेक्षित आहे. त्यापैकी आक्टोबर, २०१४ पर्यंतचा एकूण खर्च रु. ३९६.०२ कोटी असून झालेल्या खर्चामध्ये सिडकोचा वाटा रु. २६५.३३ कोटी व रेल्वेचा वाटा रु. १३०.६९ कोटी इतका आहे. उपमुख्य अभियंता (सी) जेएनजे यांनी त्यांचे पत्र दि. २८.१०.२०१४ नुसार ऑक्टोबर, २०१४ पर्यंतच्या खर्चाचा तपशील सिडकोकड सादर केल्यानुसार संपुर्ण खर्चाचा आढावा घेऊन सिडकोकडून मध्य रेल्वेला उर्वरित रु. ७२.०० कोटीचा धनादेश दि. २६.११.२०१४ रोजी सूपूर्द करण्यात आला आहे.

---

**राज्य शासनाच्या सेवेतील ४५ दोषी अधिकारी, कर्मचा-यांची १९१ कोटी १३ लाख रूपयांची संपत्ती गोठविण्याचे दिलेले आदेश**

**(५) ५४४१ (२०-०८-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे**

**(कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या शिफारशीवर राज्य शासनाच्या सेवेतील ४५ दोषी अधिकारी, कर्मचा-यांची १९१ कोटी १३ लाख रूपयांची संपत्ती गोठविण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले असल्याची माहिती दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोट्याधीश माजी उपजिल्हाधिकारी नितीश ठाकूर यांच्या १४३ कोटीच्या मालमत्तेसह राज्यातील इतर आठ भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या मालमत्ता गोठवण्याच्या तयारीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०१५) :** (१) होय.

(२), (३) व (४) अपसंपदा गोठविणेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सादर केलेल्या ४५ प्रकरणांपैकी एकूण ३२ प्रकरणांमध्ये रु १,६३,६१,५५,०७९/- इतकी मालमत्ता गोठविण्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राधिकारपत्र देण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यामध्ये श्री.नितीश ठाकूणर, तत्कालीन उप जिल्हाधिकारी यांच्या मालमत्तेचा देखील समावेश आहे.

---

**राज्यातील शासकीय, सार्वजनिक प्रधिकरण आणि चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे संचालित शिक्षण संस्थाना कृषक आणि नाविकास झोनमधील इमारतीना जादा एफएसआय देण्याबाबत**

**(६) ५८६७ (१०-०५-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय, सार्वजनिक प्राधिकरण आणि चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे संचालित शिक्षण संस्थाना कृषक आणि नाविकास झोन मधील जमिनीवर इमारत बांधण्यासाठी जादा चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) देण्याचे नगरविकास विभागाने ठरविले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने काही पावले उचलली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) व (२) राज्यातील मंजूर प्रादेशिक योजनेमधील ना-विकास क्षेत्रामध्ये शैक्षणिक व वैद्यकीय संस्थांच्या इमारतींना मूळ चटई क्षेत्र निर्देशांक ०.२० व त्यावर रस्ता रुंदीकरणानुसार ०.८० पर्यंत अधिमूल्य आकारुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक असा एकूण १.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबत शासनाने दि.०५/०१/२०१५ रोजी अधिनियमाचे कलम २०(३) अन्वये सूचना निर्गमित केली होती. यावर हरकत/सूचनादारांचे अभिप्राय घेऊन नियुक्त अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार शासनाने सदरहू प्रस्ताव अंतिमत: दि.०५/०६/२०१५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूर केलेला आहे.
(३) प्रस्ताव अंतिमत: मंजूर झाला असल्याने लागू नाही.

---

### राज्यातील ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर सह बहुतांश पालिकांनी अनधिकृत महापौर निधी खाते असल्याबाबत

**(७) ६६८० (०७-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगरसह बहुतांश पालिकांमध्ये अनधिकृत महापौर निधी खाते असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा खात्यावरील जमा झालेली रक्कम सन २०१४ मध्ये पुणे महानगर पालिकेचे महापौर मोहनसिंह राजपाल यांनी महापौर पदावरुन पाय उतार होताना काढून घेतली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित महानगरपालिका व महापौरांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०७-२०१५) :** (१) श्री.महेंद्र धावडे यांनी महापौर निधी संबंधात दाखल केलेली जनहित याचिका क्र. २५/२०१२ मध्ये पुणे, ठाणे, उल्हासनगरासह बहुतांश पालिकांमध्ये अनधिकृत महापौर निधी खाते असल्याचे जुलै, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे.
(२) होय.
(३) व (४) सदर प्रकरणी श्री.महेंद्र धावडे यांनी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. २५/२०१२ दाखल केली असून, धर्मादाय आयुक्त, पुणे यांनी चौकशी अहवाल मा.उच्च न्यायालयास सादर केला आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली परिसरात शासकीय जमिनींवर अनधिकृत चाळी उभारुण फसवणूक केल्याबाबत**

**(८) ६६९३ (१०-०५-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली परिसरात शासकीय जमिनींवर अनधिकृत चाळी उभारुन नागरिकांची फसवणुक करणारी विकासकांची टोळी कार्यरत असल्याची बाब दिनांक ७ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांनी गावठाण क्षेत्रात गरजेपोटी केलेल्या बांधकाम क्षेत्रातील ड्रेनेज व सिव्हरेज लाईनबाबत**

**(९) ६८५७ (१५-१०-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांनी गावठाण क्षेत्रात गरजेपोटी केलेल्या बांधकाम क्षेत्रातील ड्रेनेज व सिव्हरेज लाईन यांची अवस्था अत्यंत वाईट झाली असल्याने त्या भागात दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागातील ड्रेजेन व सिव्हरेज लाईन सुस्थित करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे जानेवारी, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) होय, सिंडको अखत्यारितील गावठाण क्षेत्रातील मलनिस्सारण वाहिन्या सुस्थितीत ठेवण्याची व आरोग्यास हानिकारक परिस्थिती उद्भवू नये म्हणून वाहिन्यांची देखभालीची कामे सिडकोकडून हाती घेण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत १९५ खाजगी लेआऊट असून यात सुमारे १० लाख रहिवाशी वास्तव करीत असून यातील ८२ ले आऊटना नागरी सुविधा पुरविण्याबाबत**

**(१०) ७४९४ (१६-१०-२०१५). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत १९५ खाजगी लेआऊट असून यात सुमारे १० लाख रहिवाशी वास्तव करीत असून यातील ८२ ले आऊटना नागरी सुविधा पुरविण्याचा निर्णय १८ वर्षापूर्वी घेऊनही या संदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लेआऊटमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना नागरी सुविधा न पुरविण्या मागील सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, खाजगी ले आऊट मध्ये वास्तव करणाऱ्या रहिवाश्यांना न्याय देण्यासाठी यावर निश्चित धोरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) खाजगी अभिन्यास (लेआऊट) मध्ये राहणा-या रहिवाश्यांना नागरी सुविधा जसे- पाणीपुरवठा, मलनि:सारण, कचरा निवारण इ. सुविधा बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे देण्यात येतात. परंतु सदर अभिन्यासामधील अंतर्गत रस्ते, दिवाबत्तीची सोय सादर अभिन्यासाच्या मंजुरीच्या अटी व शतीनुसार मालकांनी/रहिवाश्यांनी कारणे अपेक्षित आहे.

सदर खाजगी अभिन्यासात नागरी सुविधा विकसित करण्यासंबंधी तत्कालिन पालकमंत्री यांच्या अध्यक्षेतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशींनुसार व त्यासंदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार महानगरपालिकेने दिनांक ०७.०१.२००५ चे परिपत्रक व त्याचबरोबर ८२ खाजगी अभिन्यासाची यादी जाहिर केली. परंतु खाजगी अभिन्यासातील रहिवाश्यांनी १/३ खर्च वाटून घेण्यास तयारी दर्शविली नाही. सदर अभिन्यासात मुख्य बाब ही त्यातील रस्ते दुरुस्तीसंदर्भात आहे. महानगरपालिकेमार्फत अभिन्यास मंजूर करतांना, त्यातील अटी व शर्तीनुसार सदर सुविधा मालकांनी/रहिवाश्यांनी सुस्थितीत ठेवणे अपेक्षित आहे. अभिन्यासातील रस्ते खाजगी असल्याने नियमानुसार महानगरपालिका खाजगी जमिनीवर खर्च करु शकत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कोकण किनारपट्टीचा दहशतवादी हल्ल्यापासून बचाव करण्याबाबत**

**(११) ७९८९ (०६-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोकण किनारपट्टीला दहशतवादी हल्ल्याचा सर्वाधिक धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या किनारपट्टीपासून मुंबई-गोवा महामार्गाचे असलेले अंतर, तसेच नजिकच असलेले कोल्हापूर आणि रत्नागिरीतील पर्यटन आणि धार्मिकस्थळांच्या ठिकाणी होणारी पर्यटकांची गर्दी लक्षात घेता दहशतवादी हल्ल्यापासून कोकण किनारपट्टीवर बचाव करण्याकरिता शासन स्तरावर कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना आखण्यात आल्या आहेत वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१५) :** (१) व (२) राज्यातील कोकण किनारपट्टीमधील दिघी बंदर जिल्हा रायगड येथे मोठ्या प्रमाणात शस्त्र साठा व नागला बंदर येथे आर.डी.एक्स. सारखे स्फोटक पदार्थ सागरी किनाऱ्यावर उतरवल्याच्या घटना यापूर्वी घडलेल्या आहेत. तसेच नागरी मार्गे दहशतवाद्यांनी राज्यात प्रवेश केल्याच्या घटना देखील यापूर्वी घडलेल्या असल्यामुळे सागरी किनाऱ्यावर दहशवादी हल्याचा धोका संभवतो.

कोकण परिक्षेत्रातील जिल्ह्यात एकूण ३६ सागरी पोलीस ठाणी सागरी किनाऱ्याच्या रक्षणासाठी कार्यरत आहेत. सागरीकिनाऱ्यावर पाच जिल्ह्यात ७६ चेकपोस्ट कार्यरित असून त्यावर सशस्त्र पोलीस अंमलबदार नेमले जातात. त्यांच्याकडून संशयित वाहने व व्यक्ती चेक केले जातात. तसेच बऱ्याच चेकपोस्टवर सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. ग्राम रक्षक दल व सागर रक्षक दलाची निर्मिती करण्यात आली असून त्यांच्या नियमित बैठका घेतल्याजातात. कोस्टल हेल्पलाईन क्र. १०९३ व बल्क एसएमएस यंत्रणाकार्यन्वित करण्यात आलेली आहे. सागरी किनाऱ्याचे रक्षण करण्यासाठी एकूण ४२ स्पीड बोटस सतत गस्त करतात. सागरी पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी नेव्ही व कोस्टगार्ड यांच्या सहकार्याने प्रशिक्षण दिले जाते. मच्छिमार बोटींचे कलर कोडींग करण्यात येत आहे तसेच आपत्कालीन परिस्थितीत नेव्ही, कोस्टगार्ड व इतर सुरक्षा यंत्रणांशी त्वरीत संपर्क व समन्वय साधण्याकरिता कोकण परिक्षेत्रातील सर्व जिल्ह्यांच्या नियंत्रण कक्षात स्वरमार्ग यंत्रणा बसविण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात टीडीआर संदर्भात नव्याने धोरण ठरविण्यासाठी शासनाकडून सहसंचालक, नगररचना यांच्या अध्यक्षतेखाली सात जणांचा अभ्यासगट नेमल्याबाबत

**(१२) ८२६९ (०७-४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात टीडीआर संदर्भात नव्याने धोरण ठरविण्यासाठी शासनाकडून सहसंचालक, नगररचना यांच्या अध्यक्षतेखाली सात जणांचा अभ्यासगट नेमला असून सदर गटाने माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालात गटाने कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,
(३) असल्यास, सदर शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१), (२) व (३) राज्यातील सर्व महानगरपालिका तसेच नगरपालिका हद्दीमधील विकास आराखड्यातील आरक्षित जागा टीडीआरच्या माध्यमातून ताब्यात घेण्यासाठी सुधारीत धोरण ठरविण्याकरिता शासनाने दि.११/१०/२०१२ रोजीच्या पत्रान्वये अभ्यासगट नेमण्यासाठी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविले होते. संचालक, नगर रचना यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट नेमून अभ्यासगटाचा अहवाल शासनास सादर केला आहे. अभ्यासगटाच्या अहवालातील शिफारशी विचारात घेऊन शासनान टीडीआर संबंधीचे नवीन धोरण जाहीर करण्यासंबंधीची सूचना दि.३०/०४/२०१५ रोजी जनतेच्या हरकती/सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द केलेली आहे. त्यावर नियुक्त अधिकारी यांचा अहवाल आल्यानंतर सदर धोरण अंतिम करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(४) लागू नाही.

---

**वरठी (जि.भंडारा) या अतीसंवेदनशील गांवात पोलीस विभागाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(१३) ८८२६ (०६-०७-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरठी (जि.भंडारा) या अतिसंवेदनशील गावात रेल्वे स्थानका जवळ मागील दोन महिन्यांमध्ये गँगवारचे प्रकार घडल्याने तेथे तात्पुरत्या स्वरुपात पोलीस चौकी लावण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) परंतु, सदर पोलीस चौकीला टाळे लावलेले असल्याने पोलीस विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१५) :** (१) गुन्हेगारीवर वचक निर्माण करण्याकरिता व रेल्वे स्टेशन परिसरात प्रवाशांच्या वर्दळीवर नियंत्रण ठेवण्याकरिता तात्पुरत्या स्वरुपात पोलीस चौकशी लावण्यात आली होती.
(२) व (३) वरळी (जि.भंडारा) गावामध्ये दुरक्षेत्र असल्यामुळे पोलीस विभागाचे दुर्लक्ष होत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड पोलीसांनी दहशतवादी संघटनांशी संबंधित केसमधील फरार आरोपींचा शोध घेण्यायाठी विशेष मोहिम काढल्याबाबत

**(१४) ८९१७ (०७-४-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड पोलीसांनी इंडियन मुजाहिद्दीन, लष्कर ए तोयबा, सिमी इ. दहशतवादी संघटनांशी संबंधित केसमधील फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी माहे जानेवारी, २०१५ मध्ये विशेष मोहिम काढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोहिमेअंतर्गत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणामध्ये फरार आरोपींचे शोधकामी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, रायगड यांनी दिनांक ६.१.२०१५ अन्वये रायगड जिल्ह्यातील सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आंतकवाद्यांशी संबंधित केसमधील फरार/पाहिजे आरोपींना अटक करणेबाबत. आरोपींचे फोटो, त्यांच्या संपूर्ण महितीचा तपशील सार्वजनिक /गर्दीचे ठिकाणी लावण्यात आलेले आहेत. तसेच संपूर्ण जिल्ह्यामध्ये नाकाबंदी दरम्यान वाहने चेक करुन, माहिती मिळून आल्यास तात्काळ संपर्क करणेबाबत, तसेच याबाबत जनतेमध्ये जनजागृती करुनजनतेचे सहकार्य घेऊन आरोपींना अटक करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करण्यात आला. तथापि सादर फरारी आरोपी रायगड जिल्ह्यात अस्तित्वात असल्याचा काहीएक सुगावा लागलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील ईस्टर्न फ्रीवे आणि सांताक्रुज चेंबूर लिंक रोडवरुन येणा-या वाहनांमुळे चेंबुर छेडानगर येथे होत असलेली वाहतुक कोंडी

**(१५) ८९४६ (१०-०४-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.प्रदिप जाधव-नाईक (किनवट), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ईस्टर्न फ्रीवे आणि सांताक्रुज चेंबूर लिंक रोडवरुन येणा-या वाहनांमुळे चेंबुर छेडानगर येथे होणारी वाहतुक कोंडी फोडण्यासाठी समांतर उड्डाणपूल ठाण्याच्या दिशेने जाण्यासाठी सायन येथे उड्डाणपूल तसेच नवी मुंबईतून ठाण्याच्या दिशेने येण्यासाठी उड्डाणपूल, ठाणे कल्याण भिवंडी भागातील वाहतुकीसाठी प्रकल्प अहवाल, या मुंबई आणि परिसरासाठी पायाभूत सुविधा उभारण्यासाठी एमएमआरडीएने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०७-२०१५) :** (१) व (२) मुंबईतील ईस्टर्न फ्रीवे आणि सातांक्रुझ चेंबूर लिंक रोडवरुन येणा-या वाहनांमुळे चेंबुर छेडानगर येथे होणारी वाहतूक कोंडी फोडण्यासाठी समांतर उड्डाणपूल, ठाण्याच्या दिशेने जाण्यासाठी सायन येथे उड्डाणपूल, नवी मुंबईतून ठाण्याच्या दिशेने येण्यासाठी उड्डाणपूल या कामांचे अंदाजपत्रक व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु असून सदर काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर सुरु आहे.

ठाणे-भिवंडी-कल्याण परिसरातील व सभोवतालच्या क्षेत्रात होणारा विकास, लोकसंख्या वाढ व रोजगार वाढ लक्षात घेवून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे या मार्गावर योग्य ती सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्थेची (MRTS) पून्हा तपासणी करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता सल्लागाराची निवड करण्यात आली असून पुढील काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एमएमआरडीएने वसई तालुक्यासाठी मंजूर केलेल्या अनेक कामांसाठी आर्थिक तरतूद न केल्याबाबत

**(१६) ९१०६ (०६-०४-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एमएमआरडीएने वसई तालुक्यासाठी मंजूर केलेल्या अनेक कामांसाठी अद्यापपर्यंत आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) मुंबई महानगर प्रदेशातील ग्रामीण क्षेत्राच्या विकासाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत एकात्मिक ग्राम विकास योजनेतंर्गत जिल्हा परिषद ठाणे यांनी सन २००९ मध्ये स्थानिक आमदारांच्या सहमतीने वसई तालुक्यातील १० गावे निवडून त्यांचे २१ कामांचे प्रस्ताव प्राधिकरणास हस्तांतर केले आहे. सदर १० गावातील एकूण रु. २.५ कोटीच्या एकूण २१ कामांना प्राधिकरणाने मंजूरी दिली असून आतापर्यंत रु. २.४ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर २१ कामांपैकी १८ कामे पूर्ण झाली असून उर्वरित ३ कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने ठरवून दिलेल्या बांधकाम नकाशापैकी एखादा आराखडा जिल्हा अधिकाऱ्यांकडे अर्ज केल्यास बांधकाम करता येईल अशी "टाइप प्लान" ची योजना शासनाने लागू केल्याबाबत**

**(१७) ९२५७ (१५-०७-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वत:च्या मालकीच्या दोन गुंठ्यापर्यंत च्या जागेवर घर बांधावयाचे असल्यास वास्तुविशारद (arkitech) व बांधकाम विकसन शुल्क भरण्याची गरज नाही व शासनाने ठरवून दिलेल्या बांधकाम नकाशापैकी एखादा आराखडा जिल्हा अधिकाऱ्यांकडे अर्ज केल्यास बांधकाम करता येईल अशी "टाइप प्लान" ची योजना शासनाने लागू केल्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे व याबाबतची माहिती जिल्हा व तालुका स्तरावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) व (२) होय.

राज्यातील ज्या क्षेत्रांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेले) मधील तरतूदींनुसार प्रादेशिक योजना मंजूर झालेली आहे अथवा प्रारुप प्रादेशिक योजना तयार असल्याविषयी नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे. अशा क्षेत्रांमध्ये (यापुढे "उक्त क्षेत्रे" असे उल्लेखिलेले) उक्त अधिनियमाच्या कलम १८ अन्वये संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून विकास/बांधकाम परवानगी घेणे बंधनकारक आहे. विविध कारणास्तव छोट्या आकाराच्या अधिकृत भूखंडामधील वैयक्तिक स्वरुपाच्या घरांच्या बांधकामांसाठीदखील अशी बांधकाम परवानगी मिळण्यास संबंधितांना आवाजवी विलंब होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. या पार्श्वभूमिवर अशा लहान भूखंडांसाठी, भूखंड क्षेत्रासापेक्ष प्रमाणभूत बांधकाम नकाशांच्या (Type Design) आधारे द्रुतगतीने बांधकाम परवानगी देण्याबाबत धोरणात्मक निर्णय शासनाने दि.०३/०१/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंतिमरित्या घेतला असून त्यानुषंगाने शासन निर्णय निर्गमित करुन सर्व जिल्हाधिकारी तसेच नगर रचना कार्यालयांना कळविण्यात आलेले आहे.

(३) लागू नाही.

---

**सुकळी (ता.साकोली, जि.भंडारा) येथील युवकाचा मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत सापडल्याबाबत**

**(१८) ९७६९ (१९-०८-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकळी (ता.साकोली, जि.भंडारा) येथील रामचंद्र ऊर्फ शेखर निखारे या २५ वर्षीय युवकाचा मृतदेह दिनांक ४ जानेवारी, २०१५ रोजी झाडाला लटकलेल्या अवस्थेत सापडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर युवकाची आत्महत्या नसून हत्या करण्यात आली असल्याची तक्रार दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी पोलीस स्टेशन, साकोली येथे करण्यात आली परंतू अद्याप सदर प्रकरणातील दोषींचा तपास लागला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी तपासास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१५) :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी दिनांक ०५ जानेवारी, २०१५ रोजी पोलीस स्टेशन, साकोली येथे श्री.रामचंद्र निखारे यांच्या वडिलांनी लेखी अर्ज दिला. परंतु दिनांक ०४ जानेवारी, २०१५ रोजीला अकस्मात मृत्यूची मर्ग क्र.३/१५ फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७४ अन्वये नोंद करण्यात आली होती.

पोलीस तपासात सादर युवकाचा मृत्यू कोणत्याही घातपाताने अथवा हत्येच्या उद्देशाने झाला असल्याचे कोणतेही पुरावे मिळून आले नाहीत.

या प्रकरणी शेवविच्छेदन अहवाल व व्हिसेरा रिपोर्ट यावरुप वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, साकोली यांनी हा मृत्यू Hanging असे लेखी आपल्या अभिप्रायात म्हटले आहे.

सदर प्रकरणी युवकाची हत्या झालेली नसून आत्महत्या झाली आहे व या प्रकरणी कोणी दोषी असल्याबाबत निष्पन्न झालेली नाही. उपविभागीय अधिकारी, साकोली हे या प्रकरणाचा स्वतंत्रपणे तपास करीत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नगरपरिषद उमरगा, जि.उस्मानाबाद येथे अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना वर्ग-३ या पदावर पदोन्नती देणे**

**(१९) ९९४९ (०६-४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगरपरिषद उमरगा, जि.उस्मानाबाद येथे अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना वर्ग-३ या पदावर पदोन्नती देणेबाबत उमरगा-लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी लेखी पत्राद्वारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितांद्वारे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१५) :** (१) होय.
(२) वर्ग ४ च्या कर्मचा-यांना पदोन्नती देण्यासंदर्भात दि. १८.०५.२०१५ रोजी पदोन्नती समितीची बैठक आयोजीत केली होती. तथापी समितीला कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र आढळले नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सेनगाव व गोरेगाव तसेच कनेरगाव नाका पोलीस चौकी (ता.सेनगाव, जि.हिंगोली) या पोलीस स्टेशन व पोलीस चौकीच्या इमारती अतिशय मोडकळीस आल्याबाबत

**(२०) १२४६६ (०७-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव व गोरेगाव तसेच गोरेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येणारी कनेरगाव नाका पोलीस चौकी (ता.सेनगाव, जि.हिंगोली) या पोलीस स्टेशन व पोलीस चौकीच्या इमारती अतिशय जुन्या असून मोडकळीस आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी नविन इमारतीचे बांधकाम करण्याबाबत शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१५) :** (१) ब (२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महापालिकेच्या के.ई.एम आणि नायर रुग्णालयातील क्ष-किरण विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(२१) १३०२९ (०७-४-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या के.ई.एम आणि नायर रुग्णालयातील क्ष-किरण विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात येवून क्ष-किरण विभागात काम करणारे कर्मचारी हे सतत किरणोत्सर्गाच्या सानिध्यात असल्याने त्यांच्या किरणोत्सर्गाचा दुष्परिणाम होतो, त्यांच्या शरीरावर किरणोत्सर्ग किती प्रमाणात झाला आहे हे मोजण्यासाठी या कर्मचाऱ्यांना थर्मोल्युमिनिसेंट डेसिमीटर (टीएलडी) बॅच दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने महापालिकेतर्फे कोणते खबरदारीचे पाऊल उचलण्यात आले तसेच त्यांचे पुनर्वसन व आर्थिक भरपाईसाठी कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे वा प्रस्तावित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे. मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. आणि नायर रुग्णालयाती क्ष-किरण विभागात काम करणा-या कर्मचा-यांना किरणोत्सर्गाचा दुष्परिणाम मोजण्यासाठी देण्यात येणारे थर्मोल्युनिमिसेड डेसिमिटर (टीएलडी) बॅचेस बी.ए.आर.सी ने प्रमाणित केलेल्या रेनेनटेक लॅबोरेटरी प्रा.लि. या कंपनीकडून त्रैमासिक तत्वावर घेण्यात येतात व त्यानुसार कर्मचा-यांना सदर बॅच पुरविण्यात येतात.

(२) थर्मोल्युनिमिसेड डेसिमिटर (टीएलडी) बॅचेस हे किरणोत्सर्गाचा दुष्परिणामाचे मोजमाप करण्यासाठी वापरले जातात. टीएलडी बॅचेस वापरल्याने कर्मचा-यांचे त्रैमासिक तत्वावर किरणोत्सर्गाचा दुष्परिणाम मोजला जातो.

किरणोत्सर्गाच्या कक्षेत काम करणा-या कर्मचाऱ्यांना या दुष्परिणामापासून संरक्षित करण्यासाठी कॉल्यूमीटर प्रोटेक्टीव्ह, मॅकॅनिकल बॅरिअर्स, लेड ॲप्रन, लेड ग्लास, थॅराईडख, गोनलशिल्डससारखी उपकरणे उपलबध आहेत. ही उपकरणे वापरल्यास क्ष-किरणांपासून कर्मचा-यांचे संरक्षण होते.

क्ष-किरणापासून होणारे दुष्परिणाम निदानसूचक पध्दतीचे असल्यामुळे दुष्परिणाम होण्याची शक्यता कमी असते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी उद्योगांसाठी परवाने देण्याच्या धोरणात मोठे बदल करण्यात आल्याबाबत**

**(२२) १३०४६ (०९-०४-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी उद्योगांसाठी परवाने देण्याच्या धोरणात मोठे बदल करण्यात आले असून ३०० पेक्षा कमी कामगार असल्यास मालकाला केव्हाही कारखाना बंद करता येणार तसेच २० पेक्षा कमी कामगार असल्यास अशा उद्योगांना कामगार कायद्यातून वगळले जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील उद्योग वाढविण्यासाठी शासनातर्फे प्रयत्न केले जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संघटीत व असंघटीत कामगारांच्या हिताच्या दृष्टीने शासनातर्फे कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला वा प्रस्तावित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२२-०७-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राज्यात औद्योगिकीकरणाला चालना मिळावी आणि अधिकाधिक रोजगार निर्मिती व्हावी याकरीता कामगार कायद्यात सुधारण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून २० कामगार कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

राज्यातील बांधकाम क्षेत्रात काम करणा-या जास्तीत जास्त कामगारांची महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी व्हावी या दृष्टीकोनातून मंडळामार्फत विविध माध्यमांद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनिमय, २००८ अन्वये राज्यातील सर्वच क्षेत्रातील असंघटीत कामगारांसाठी राज्यस्तरावर “महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा मंडळ” स्थापन करण्याचे प्रस्तावित असून सदर मंडळामार्फत असंघटीत कामगारांची नोंदणी करुन त्यांना कार्ड वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यानुसार नोंदणीकृत कार्डधारक असंघटीत कामगार हे केंद्र शासन व राज्य शासनामार्फत राबविल्या जाणा-या विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ घेऊ शकतील

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयात पोलिसांच्या संख्येच्या प्रमाणात पोलिस वसाहतीत घरे नसल्याबाबत**

**(२३) १३४५० (०७-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात पोलिसांच्या संख्येच्या प्रमाणात पोलिस वसाहतीत घरे नाहीत असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पोलिस मुख्यालय सोलापूर येथील पोलिस निवासस्थाने १९१६ साली निर्माण केलेली असून या वास्तू तांत्रिकदृष्ट्या धोकादायक व जीर्ण झालेल्या आहेत, असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांच्या वसाहतीत घरे वाढ करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) सोलापूर शहरातील पोलीस विभागाच्या काही पोलीस वसाहती जीर्ण झालेल्या आहेत. माळशिरस येथे नवीन निवासस्थानाचे बांधकाम सुरु आहे. काही अन्य ठिकाणी निधीच्या उपलब्धतेनुसार निवासस्थाने बांधण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाकुर संकुल (कांदिवली पूर्व) परिसरामध्ये व ९० फिट रोड येथे**
**रिक्षा पार्किंग मोठ्या प्रमाणात होत असल्याबाबत**

**(२४) १३५८७ (०७-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाकुर संकुल (कांदिवली पूर्व) परिसरामध्ये व ९० फिट रोड येथे रिक्षा अनधिकृतपणे उभी केली जात असल्याचे स्थानिक रहिवासी व लोकप्रतिनिधींनी वारंवार तक्रारी दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, परिसरामध्ये रिक्षा पार्कींग मोठया प्रमाणात होत आहे व तसेच रिक्षा पार्कींग माफिया तयार होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्षाच्या आडोशामध्ये गदुल्ले तसेच समाजकंटकामार्फत विघातक गोष्टी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, रिक्षा पार्कींग व समाजकंटक लोकांवर प्रशासनाने काय कारवाई केली आहे, असल्यास, त्याचे स्वरुप काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :** (१) कांदिवली (पूर्व) भागातील ठाकूर संकुल व ९० फुट रोड या परिसराती पार्कींगबाबत स्थानिक रहिवाशांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) सदर ठिकाणी वाहतूकीच्या संदर्भात कोणतीही गंभीर समस्या निर्माण झाली नाही.
(३) ९० फुटी रोडवर रात्री ९.०० नंतर गावदेवी रोड परिसरातील रहिवाशांच्या रिक्षा व इतर वाहनांची पार्कींग होत असते. तथापि, रिक्षा पार्कींग माफिया तयार होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(४) व (५) या परिसरात अंमली पदार्थाचे सेवनकरणा-या इसमांवर या वर्षी ९ जणांवरकारवाई करण्यात आली आहे.
९० फुटी मार्गावर वाहतूकीस अडथळा ठरणा-या १५३ वाहनांवर कारवाई केली आहे. तसेच, समतानगर पोलीस ठाणे येथे एका वाहनचालकांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याकरिता राज्य शासनाने मा.सीताराम कुंठे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीबाबत

**(२५) १४७३३ (०७-०४-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याकरिता राज्य शासनाने सीताराम कुंठे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने आपला अहवाल राज्य शासनास माहे फेब्रुवारी, २०१५ रोजी सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहवालानुसार कुठल्या शिफारशी करण्यात आल्या असून या शिफारशीस अनुसरुन शासनाने धोरण ठरविले आहे काय,
(३) असल्यास, या अहवालावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) होय.

(२), (३) व (४) अनधिकृत बांधकामे व तयावर कार्यवाही संबंधाने मा.उच्च न्यायालयात विविध जनहीत याचिका दाखल झाल्या आहे. या याचिकांमधील अनधिकृत बांधकामासंबंधी पारित झालेल्या न्यायालयीन निर्णयाचा अभ्यास करुन सदर अहवालावर शासनस्तरावर कार्यवाही करण्याचे काम सुरु आहे.

---

**पुणे शहराचा जुन्या हद्दीचा विकास आराखडा तयार करण्याबाबत**

**(२६) १५९७९ (१५-१०-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराचा जुन्या हद्दीचा विकास आराखडा तयार करताना प्रशासनाने सर्व्हे नंबर चुकीचे दर्शवून अशा ७१ चुका केल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच विशिष्ट व्यक्ती आणि बिल्डरांसाठी आरक्षणे बदलली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील मोठ्या इमारती, थिएटर, मॉल यांच्या समोरील रस्त्यांची रुंदी १५ मीटर असतांना विशिष्ट व्यक्ती आणि बिल्डरांच्या हितासाठी १२ मीटर करण्याचे सुचविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) उक्त प्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१), (२), (३) व (४) पुणे शहराचा वाढीव मुळे हद्दीचा प्रारुप विकास आराखडा, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये दि.२८ मार्च, २०१३ रोजी प्रसिध्द झाला आहे. यामधील विद्यमान जमीन वापर नकाशामध्ये असलेल्या त्रुट्या, आरक्षण बदलाबाबत महासभेचे विसंगत ठराव, नियोजन समितीचे सदस्यांचे विसंगत अहवाल तसेच नियोजन समितीच्या अहवालावर नियोजन प्राधिकरणाने विहित कालावधीमध्ये प्रारुप विकास आराखडा अधिनियमाचे कलम ३० अन्वये शासनास सादर करण्याबाबत निर्णय न घेतल्याने शासनाने दि.२७ मार्च, २०१५ चे आदेशान्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे १६२ अन्वये आराड्याबाबतची पुढील कार्यवाही करणेकरीता मा.विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका आयुक्त पुणे व सहसंचालक, नगर रचना यांची समिती गठीत केली आहे. सदर समितीतर्फे सर्वकष फेरतपासणी होऊन विकास योजना आराखडा शासनास सादर करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नही.

---

**खडकवासला येथील नवचैतन्य सोसायटी, वारजे जकातनाका मध्ये कोणतीही परवानगी न घेता मोबाईल टॉवर बसविण्यात आल्याबाबत**

**(२७) १५९८४ (०८-०४-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (जि.पुणे) येथील नवचैतन्य सोसायटी, वारजे जकातनाका मध्ये कोणतीही परवानगी न घेता मोबाईल टॉवर बसविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनीने शासनाच्या संबंधित खात्याकडे मोबाईल टॉवर नियमान्वित करण्याचा प्रस्ताव दाखल केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शासनाकडून नविन टॉवर परवाना व अस्तित्वातील टॉवर नियमान्वित करणेबाबत नियमावली प्रसिध्द केल्यानुसार दिनांक ४ सप्टेंबर, २०१४ रोजी ही टॉवर नियमान्वित करण्याची अखेरची मुदत दिली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, दिलेल्या मुदतीत नवचैतन्य सोसायटी, वारजे जकात नाका मध्ये बसविलेला टॉवर नियमावलीतील तरतुदीनुसार नियमान्वित करुन घेतला नसतानाही शासनाकडून सदर टॉवर काढण्याची कार्यवाही केली गेली नाही, हे खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये IT / TSP यांनी याचिका क.२०४३/२०१४, २०४७/२०१४, दि.२२/०९/२०१४ रोजी दाखल करुन दि.०४/०३/२०१४ रोजीच्या शासन नियमावलीस आव्हान देऊन अस्तित्वातील टॉवर पाडून नयेत म्हणून मनाई हुकूम आणल्यामुळे कारवाई सध्या स्थगित आहे. सदर ठिकाणचा मोबाईल टॉवर नियमित करण्यासाठी दि.०२/०१/२०१५ रोजी प्रस्ताव पुणे महानगरपालिकेकडे सादर झालेला आहे.

(५) मा.मुबई उच्च न्यायालयातील उपरोक्त न्यायप्रविष्ट याचिकेमुळे कारवाई करणे पुणे महानगरपालिका प्रशासनास शक्य झाले नाही.

---

**वास्तुशिल्पकार पदवीधर नसताना सुध्दा तुमसर नगरपरिषदेची दिशाभूल केल्याबाबत**

**(२८) १६१९२ (०८-०४-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वास्तुशिल्पकार पदवीधर नसताना सुध्दा तुमसर नगरपरिषदेची दिशाभूल करुन श्री.दिपक कठाने, रा.तुमसर, जि.भंडारा यांनी सन २००३-२००४ या वित्तीय वर्षात दलितवस्ती योजनेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन वास्तुशिल्पकार म्हणून २ लाख ७६ हजार रुपये उचल केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात मुख्य अधिकारी, नगरपरिषद तुमसर यांनी दिनांक २३ नोव्हेंबर, २०१२ रोजी श्री.कठाने यांना उचल म्हणून घेतलेली रक्कम परत करण्याबाबत पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकारी भंडारा यांचे दिनांक २ जुलै, २०१२ च्या आदेशानुसार जबाबदार व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :** (१), (२), (३) व (४) सन २००३-२००४ या वित्तीय वर्षात दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत श्री.दिपक कठाने, रा.तुमसर, जि.भंडारा यांना वास्तुशिल्पकार म्हणून कोणतयाही प्रकारची रक्कम अदा करण्यात आलेली नाही. संबंधित कार्यालयीन दस्तोवजांची तपासणी केली असता सन २००४-२००५ या वित्तीय वर्षात वास्तुशिल्पकार म्हणून दलित वस्ती सुधार योजनेअंतर्ग श्री.दिपक कठाने यांना दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत रुपये २ लाख ७६ हजार रुपये इतक्य रक्कमेचे प्रदान करण्यात आले असल्याचे जिल्हाधिकारी यांनी नमुद केले आहे.

या संदर्भात स्थानिक लेखा परिक्षणांतर्गत लेखाआक्षेप घेण्यात आले असून जबाबदारी निश्चित करण्याकरिता चौकशी सुरु करण्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी यांनी नमुद केले आहे.

---

## दहिसर (प) मुंबई येथील महानगरपालिकेच्या खेळाच्या मैदानाचा बेकायदा घेतलेला ताबा

**(२९) १६२७८ (१९-०५-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिसर (प) मुंबई येथील महानगरपालिकेच्या हरिदास पार्क मधील आचार्य विनोबा भावे मैदानावर स्थानिक नगरसेविका व त्यांच्या महिला कार्यकर्त्यांनी बेकायदा ताबा मिळविण्याची घटना नुकतीच निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहिती अधिकाराबाबतच्या निर्णयात संबंधित मैदान मुलांना खेळण्यासाठी देण्यात यावे असे आदेश राज्य माहिती आयुक्तांनी दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पार्कचे सुशोभिकरण रहिवाशांचा विरोध डावलून या भागातील नगरसेविकेनी केले व त्याचा ताबा आपल्या माहिती कार्यकर्त्यांकडे दिला, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही. दहिसर (प.) हरिदास पार्क येथील आचार्य विनोबा भावे मैदान हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.
(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. सदर मैदान हे महानगरपालिकेतर्फे नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदारामार्फत परिरक्षित करण्यात येत असून कंत्राटदारामार्फत माळी व सुरक्षा रक्षक तैनात केलेले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे जिल्ह्यातील पाझंरा नदी परिसरात पर्यटन स्थळ बनविण्याबाबत

**(३०) १६४५३ (१०-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यातील पाझंरा नदी परिसरात स्वच्छता मोहिम राबवून तेथे पर्यटन स्थळ बनविले जाणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा अभिनव प्रकल्पाचे उदिष्ट साधण्याच्या दृष्टीने शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत,
(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१५) :** (१) नाही. तथापि, प्रश्नाधिन स्थळी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे. धुळे महानगरपालिकेमार्फत नदी संवर्धन योजनेंतर्गत पाझरा नदी सुधार प्रस्ताव पर्यावरण विभागास सादर करण्यात आलेला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील इमारत आणि इतर बांधकाम कल्याण मंडळाला कामगारांना सुरक्षा, आरोग्य आणि कल्याणकारी सेवा पुरविण्याबाबत

**(३१) १६८२७ (१२-०८-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने बांधकाम व्यवसायातील नाका कामगारासाठी राज्यात मुंबईसह ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद,कोल्हापूर व जालना या महानगरात मोठया

प्रमाणात कार्यरत असलेल्या कामगारांची कामगार कल्याण खात्याच्या उदासीन वृत्तीमुळे ३३ लाख कामगारापैकी केवळ १ लाख ९२ हजार कामगारांची नोंदणी केल्यामुळे त्यातील स्थलांतरित झाले असल्याने शासनाकडे केवळ ८२ हजार कामगारांची माहिती उपलब्ध असल्याने उर्वरीत ३१ लाखांच्यावर कामगार शासनाच्या आरोग्य व अपघात विमाच्या लाभापासून वंचित राहिले असल्याचे बाब सप्टेंबर, २०१३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील असंघटीत कामगारांच्या कल्याणासाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कल्याण मंडळाला कामगारांना सुरक्षा, आरोग्य आणि कल्याणकारी सेवा पुरविण्यात अपयश आले आहे, हे खरे आहे काय,

(३) राज्यातील असंघटीत क्षेत्रात ५५ लाख कामगार असुन शासनाच्या अनास्थेमुळे केवळ दोन लाखांच्या दरम्यानच कामगारांची नोंदणी झाली असून यामुळे कामगांरासाठी सरकारकडे ३० हजार, कोटी रुपयांची रक्कम उपकारांच्या माध्यमातून जमा असून देखील नोंदणीच न झाल्यामूळे लाखो कामगार विविध योजनांच्या लाभापासून वंचित राहिले असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कामगारांची नोंदणी न करण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधीतांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे तसेच जास्तीत जास्त कामगारांची नोंद करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१४-१०-२०१५) :** (१)हे खरे नाही.

इमारत व इतर बांधंकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम १२(१) नुसार - i) ज्यांचे वय १८-६० वर्षादरम्यान आहे व ii) ज्यांनी मागील वर्षभरात कमीत कमी ९० दिवस बांधकाम कामगार म्हणून काम कलेले आहे, असे कामागराच मंडळाकडे नोंदणी होण्यास पात्र ठरतात. तसेच बांधंकाम कामगारांची नोंदणी ही एक वर्षासाठीच वैध असून व वर्षानंतर बांधकाम कामगाराने आपल्या नोंदणीचे नुतनीकरण करणे गरजेचे आहे. त्यानुसार मंडळाकडे आजपावेता ३,८१,७७१ बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे.

मंडळाला विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगारास मंडळाकडे नोंदित असणे गरजेचे असल्याने सप्टेंबर, २०१३ च्या सुमारास मंडळाकडे जेवढे जिवित नोंदित बांधकाम कामगार होते त्यांसाठीच मंडळामार्फत आरोग्य व व अपघात विमा लागू करण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधंकाम कामगार कल्याण कारी मंडळामार्फत एकूण १७ विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. सदर योजनांचा लाभ जास्तीत जास्त बांधकाम कामगारांपर्यंत पोहोचविण्यासाठी मंडळ सतत प्रयत्नशील आहे.

(३) हे खरे नाही.

माहे मे, २०१५ अखेर मंडळाकडे सुमारे ३,७२,९९९ बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे येथील मुंब्रा बायपास रस्त्यावर अमोनिया वायूने भरलेला टँकर दरीत कोसळून तसेच मुंबई-गोवा हायवेवर पेणजवळ दोन ट्रकचा झालेला भीषण स्फोट**

**(३२) १७९४१ (२१-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मुंब्रा बायपास रस्त्यावर दिनांक २४ मे, २०१५ रोजी अमोनिया वायूने भरलेला टँकर दरीत कोसळून गंभीर अपघात झाला तसेच मुंबई मुंबई-गोवा हायवेवर पेणजवळ दोन ट्रकच्या झालेल्या भीषण धडकेनंतर गॅस सिलिंडरने भरलेल्या ट्रकचा स्फोट होऊन अग्निकल्लोळ झाल्याची घटना माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी करण्यात येत असलेली कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच या मुंब्रा बायपास येथे होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि. २४.५.२०१५ रोजी ठाणे येथील मुंब्रा बायपास मार्गावर अमोनिया वायूने भरलेल्या टँकरचा टँकरचालकांच्या निष्काळजीपणामुळे घडलेला असून त्यांच्याविरुध्द मुंब्रा पोलीस ठाणे येथे ग.र.नं. ५१६/२०१५, भा.दं.वि. सं. कलम २७७, २७८, २७९, २८४, २८७, ३३६, ४२७, ३४ सह मो.वा. कायदा. कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे. आरोपीस अटक केली असून न्यायालयात दि. २०.८.२०१५ दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे.

मुंबई गोवा महामार्गावर पेण तालुक्यातील हमरापूर गावाजवळ गॅस सिलेंडरने भरलेला ट्रक व लोखंडी अँगल वाहतूक करणारा ट्रक यांच्यामध्ये अपघात घडला. या अपघातात गॅस सिलेंडरने भरलेल्या ट्रकमध्ये लोखंडी अँगल घुसल्याने स्फोट झाला. सदर अपघात लोखंडी अँगल वाहून नेणाऱ्या ट्रक मालकांच्या निष्काळजीपणामुळे घडलेला असून त्यांच्याविरुध्द पेण

पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ९४/२०१५ भा.दं.वि.सं कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ सह मो.वा.का. कलम १८३,१८४,१३४,१२९/१७७ प्रमाणे गुल्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(३) अपघातांना आळा घालण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अपघात झालेल्या ठिकाणी तुटलेल्या क्रॅश बॅरिअर्सची दुरुस्ती करुन नवीन क्रॅश बरिअर्स बसविण्यात आले आहे. तसेच, संरक्षण भिंत, गॅबियन वॉल, परॉमेट वॉल, लँड स्लाईड प्रतिबंधक जाळी बसविणे व अभियांत्रिकी सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.

रस्त्यावरील वाहतुक नियंत्रणासाठी थर्माप्लास्टीकचे पट्टे देऊन राबलर स्ट्रिप्सचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

वाहनांची वेगमर्यादा नियंत्रणासाठी दोन्ही दिशेने वळणदर्शक इशारार्धक , धोकादायक वळण, इत्यादी सूचना फलक लावण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खुलताबाद तालुक्यातील (जि.औरंगाबाद) वारसा स्थळाजवळील शुलिभंजन ग्रामीण पर्यटक शॉपिंग मॉल व उद्यानाची दुरावस्था झाल्याबाबत

**(३३) १८०४२ (१२-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुलताबाद तालुक्यातील (जि.औरंगाबाद) वारसा स्थळाजवळ अनेक सुविधा उभारण्यात येऊन पर्यटकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी स्थानिक कलाकारांना रोजगार मिळावा यासाठी शुलिभंजन ग्रामीण पर्यटक शॉपिंग मॉल उभारण्यात आला असून देखभाली अभावी बंद असून उद्यानाचीही दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खुलताबाद हा शासनाने पर्यटक तालुका म्हणून घोषित केल्यानंतर पर्यटकांच्या सोयीसाठी केंद्र तसेच राज्य शासनाने अनेक योजना राबवून कोट्यवधी रुपयांचा खर्च करुनही सदर मॉल व उद्यानाच्या देखभालीसाठी कोणतीच व्यवस्था न करण्याची कारणे काय आहेत,

(३) त्यानुषंगाने करावयाच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१०-२०१५) :** (१), (२) व (३) खुलताबाद पर्यटक तालुका म्हणून घोषित करण्यात आलेल्या नाही. शॉपिंग मॉल महाराष्ट्र लघु उद्योग महामंडळ यांना १० वर्षाच्या मुदती करीता भाड्याने देण्यात आला आहे. तथापि सध्या बंद अवस्थेत आहे. उद्यान परिसरातील धर्मा तलाव संवर्धन व सौदर्यीकरण, बोटींग व्यवस्था, बाग बनी बेगम बाग, अॅप्रोच रोड इत्यादी विकास कामांच शहर विकास आराखडा (City development plant) तयार करण्यात आलेला आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयात कल्याणकारी मंडळाच्या स्थापनेबाबत**

**(३४) १९६७९ (११-०८-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ मे, २०११ च्या कल्याणकारी मंडळाच्या स्थापनेनंतर शासनाने बांधकाम कामगारांसाठी १३ कलमी जाहिर केलेल्या योजनेची कोल्हापूर जिल्हयात अद्यापपर्यंत अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या योजनेची अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१४-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत एकूण १७ कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. सदर योजनांतर्गत नोंदित बांधकाम कामगारांना लाभ देण्यात येत असून कोल्हापूर कार्यालयात दिनांक १५.१२.२०११ पासून प्रत्यक्षात नोंदणीचे कामकाज सुरु झाले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिडकोतील द्रोणागिरी नोड, सेक्टर ४७, प्लॉट नं. २ मधील भूखंडावर इमारत बांधण्याकरीता ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत**

**(३५) १९८१६ (१०-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोतील द्रोणागिरी नोड, सेक्टर ४७, प्लॉट नं. २ मधील भूखंडावर इमारत बांधण्यासाठी ग्राहकांकडून नोंदणी व आगाऊ रक्कम स्वीकारुन ग्राहकांची फसवणूक करुन श्री.अशोक रामजी गाळा-प्रो. (श्री.शांतीनाथ एंटरप्रायजेस) फरार झाला असून या संदर्भात तातडीने पोलीस चौकशी करुन बांधकाम व्यावसायिकांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचेकडे दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी श्री.शाम म्हात्रे, कामगार नेते यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१५) :** (१) होय.

(२) प्रो. श्री.शांतीनाथ एंटरप्रायजेस यांच्याविरुध्द उरण पोलीस ठाणे येथे एकूण ३ गुन्हे दाखल आहेत.

१. सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.क्र..०७/१५, भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ अन्वये गून्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी दोन आरोपी असून एका आरोपीस अटक करण्यात आली असून त्यास जामीन मिळाला आहे. दुसरा आरोपी फरार आहे.

२. सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.क्र. ४२/१५ , भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली नाही.

३. सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेलया तक्रारीवरुन गु.र.क्र. ८९/१५, भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, सदर प्रकरणी तीन आरोपी असून दोन आरोपीस अटक करण्यात आली असून त्यास जामीन मिळाला आहे. तिसरा आरोपी फरार आहे.

तिन्ही गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केडगांव (जि.अहमदनगर) येथे एका १३ वर्षाच्या मुलींवर तिच्या आईच्या प्रियकराने शारिरिक अत्याचार केल्याबाबत**

**(३६) २०८१३ (१२-०८-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केडगांव (जि.अहमदनगर) येथे एका १३ वर्षाच्या मुलींवर तिच्या आईच्या प्रियकराने शारिरिक अत्याचार केल्याने मुलगी गर्भवती असल्याचे दिनांक २८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलिसांनी संबंधित दोषीविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१५) :** (१) होय.

(२) आरोपीविरुध्द कोतवाली पोलीस स्टेशन ता.जि.अहमदनगर गुरन.१००/१५ भादवि कलम ३७६ (२) (आय) (एम) ३५४ ए (१) सह लहान बालकांचा लौंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१५ चे कलम ५ जे (II), ५ एल कलम ६ प्रमाणे दि. २६.४.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र शासनाच्या किराणा बाजार व दुकान मंडळात नोंदीत असलेल्या टोळी क्र.६०७९ व ६०८० मध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगारांना मे.ॲकदास मेरीटाईम एजन्सीने प्रा.लि. या कंपनीने थकीत वेतन देण्याबाबत**

**(३७) २१३४९ (११-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या किराणा बाजार व दुकान मंडळात नोंदीत असलेल्या टोळी क्र.६०७९ व ६०८० मध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगारांना मे.ॲकदास मेरीटाईम एजन्सीने प्रा.लि. या कंपनीने थकीत पगाराची रक्कम रु.७८,९१,९४२/- तातडीने मिळवून देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास कामगार मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी पगार न मिळाल्यामुळे उक्त टोळीतील माथाडी कामगार कर्ज बाजारी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माथाडी कामगारांची पगाराची थकीत रक्कम उक्त कंपनीकडून तातडीने मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीचे स्वरुप काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१४-१०-२०१५) :** (१) नाही. अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, महाराष्ट्र राज्य माथाडी आणि जनरल कामगार युनियन यांनी याच विषयी जिल्हाधिकारी, रायगड यांना पाठविलेल्या व मा.मुख्यमंत्री सचिवालयास पृष्ठांकीत केलेल्या दि.१९/१/२०१५ रोजीच्या पत्राची प्रत शासनास प्राप्त झाली होती.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र राज्य माथाडी आणि जनरल कामगार युनियन यांच्या दि. १९/१/२०१५ रोजीचे निवेदन उचित कार्यवाहीस्तव कामगार आयुक्त यांना शासनाच्या दि.१६/५/२०१५ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आले आहे. दरम्यान किराणा बाजार व दुकाने मंडळाने सदरहू आस्थापनेकडून टोळी क्र. ६०७९ व ६०८० ची मजूरी व लेव्हीची थकीत रक्कम वसुल करण्यासाठी माथाडी कायद्याच्या कलम १३ अंतर्गत दि.१/६/२००९ रोजी जिल्हाधिकारी, रायगड यांना वसूली प्रमाण पत्र दिले असता आस्थापनेने त्याविरोधात मा.उच्च न्यायालयाने आस्थापनेस रु. ५० लक्ष मंडळाकडेजमा करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार व्यवस्थापनाने रु. २५ लक्ष मंडळाकडे जमा केले असून सदर रक्कम मंडळाने कामगारांना वाटप केली आहे. उर्वरित रु. २५ लक्ष एवढ्या रकमेसाठीचे दोन धनादेश व्यवस्थापनाने तहसिलदार, रायगड यांचेकडे जमा केले होते. तथापि, सदरहू धनादेश न वाटल्यामुळे तहसिलदारांनी कळंबोली पोलीस ठाण्यात परिक्राम्य लेखा अधिनियमाच्या कलम १३८ अन्वये व्यवस्थापनाकरिता

तक्रार दाखल केली आहे. दरम्यान उर्वरित थकीत रकमेच्या वसुलीबाबत मंडळामार्फत जिल्हाधिकारी, रायगड व मुंबई यांचेकडे पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव येथे घटस्फोटीत तरुणीचे पोलीस अधिकाऱ्यांने शारिरीक शोषण केल्याबाबत**

**(३८) २१४२६ (१२-०८-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव येथे एका पोलीस अधिकाऱ्यांने घटस्फोटीत तरुणीला केसच्या निमित्ताने तिचे शारिरीक शोषण करुन तसेच आमिष दाखवून फसविले असून सदर तरुणीने त्यांची तक्रार करु नये म्हणून तिला धमक्याही देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पोलीस अधिक्षक याच्याकडे तक्रारही करुनही संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई अद्याप झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
अर्जदार महिलेने तिला धमक्या दिल्याबाबत तक्रार अर्ज दिलेला आहे.
(२) व (३) अर्जदार महिलेने दिलेल्या तक्रार अर्जानुसार सखोल चौकशी करण्यात आली असून, चौकशीत अर्जदार महिलेस धमक्या दिल्याबाबत कुठलाही पुरावा मिळून आलेला नाही. परंतु तक्रारदार महिलेशी ओळख वाढवून तिचेशी भ्रमणध्वनी वरून बोलणे करुन मैत्री वाढविण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले असून, आरोपी सहायक पोलीस निरिक्षक यांना दोन वर्ष कालावधीसाठी पुढील वार्षिक वेतनवाढ का रोखण्यात येऊ नये अशी दाखवा नोटीस दि. ४.९.२०१५ रोजी दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गावठाण हद्दीलगतच्या शेती व शेती नाविकास झोन मध्ये अधिमुल्य भरून निवासी बांधकामास परवानगी देण्याबाबत**

**(३९) २१९१७ (१५-१०-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गावठाण हद्दीलगतच्या शेती व शेती ना विकास झोन मध्ये अधिमुल्य भरून निवासी बांधकामास परवानगी देण्याचा निर्णय शासनाने मे, २०१५ वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय तात्काळ अंमलात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :** (१) होय.

महाराष्ट्रातील सर्व प्रादेशिक योजनांमधील ना-विकास क्षेत्रामध्ये गावठाणालगत विवक्षित अंतरामध्ये रहिवास वापर अधिमूल्य आकारुन अनुज्ञेय करण्याचा निर्णय दि.०६/०५/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार घेण्यात आलेला आहे.
(२) सदर निर्णय तात्काळ दि.०६/०५/२०१५ पासून अंमलात आलेला आहे.
(३) लागू नाही.

---

**बारामती (जिल्हा पुणे) तालुक्यातील नीरा नदीवरील बंधारा स्फोटकांनी उडवून दिल्याबाबत**

**(४०) २१९३८ (१२-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील बारामती येथे नीरा नदीवरील बंधारा स्फोटकांनी उडवून देण्याची घटना माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले व तदनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१५) :** (१) सातारा जिल्ह्यात कांबळेश्वर ता.फलटण येथील निरा नदीवरील बंधारा स्फोटकांनी उडविणेची घटना दिनांक २६ मे, २०१५ रोजी रात्री ०२.०० वा चे सुमारास घडली आहे.
(२) सदर घटनेच्या अनुषंगाने पाटबंधारे विभागाचे शाखाधिकारी यांनी सविस्तर फिर्यादीवरुन फलटण ग्रामीण पोलीस ठाणे, जिल्हा सातारा येथे गु.र.क्र. १२०/२०१५ भादविस कलम ४३० सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा कलम ३(२)(a) , ४ स्फोटक कलम कायदा कलम ३(a) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौकशी अंती कांबळेश्वर पॉईन्टवरील वाळू लिलावामध्ये भागीदार असणारे ०७ संशयीत आरोपींना अटक करण्यात आली असून त्याचेकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्यांची कबुली दिली आहे. तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली इलेक्ट्रीक वायर, २ मोटार सायकल, १२ व्होल्टची बॅटरी, शॉर्ट फायरचे लायसन्स व रजिस्टर , हिशोबाची वही, हस्ताक्षर नमुने, सहीचे नमुने असा मुद्देमाल जपत करण्यात आला आहे तसेच आरोपी क्रमांक ९ यांचे शार्ट फायरचे मुळे लायसन्स जप्त करुन ते रद्द होणेकामी मा.चिफ कंट्रोलर ऑफ एक्सप्लोसिव्ह मुंबई यांना अहवाल पाठविणेत आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे,
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरात अनेक ठिकाणी भूमाफियाव्दारे जमीन बळकावण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याबाबत

**(४१) २२०८५ (१०-०८-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात अनेक ठिकाणी शस्त्राच्या जोरावर जमीन बळकावण्याचा प्रयत्न भूमाफियाव्दारे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळमना येथील कोटयावधी रुपयाची जमीन बळकावण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतू पोलीसांमार्फत कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, भरतवाडा येथील सात एकर जमीनीवर गृहनिर्माण संस्थेनी भुखंड पाडून विक्री केली असून ते सुध्दा भूखंड भूमाफियांच्या मदतीने बळकावण्याचा प्रयत्न सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत नागरीकांनी पोलीस प्रशासनाला वेळोवेळी अवगत केला असता अद्यापपर्यंत त्यावर कुठलीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

नागपूर शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत पोलीस स्टेशन कळमना हद्दीत माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये पुनापुर जुनी वस्ती, नारायण महाजन प्राथमिक शाळेजवळ, भवानीनगर, पारडी, नागपूर येथील इसमाने त्याच्या ताब्यात असलेली जमीन काहीलोक बळकावण्याचा प्रयत्न करीत असल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.क्र.३४/२०१४, भा.दं.वि. १४३, १४४, १४९, ४४७, ४४८, ४४९, २९४, ५०६ (ब), भारतीय हत्यान कायदा सहकलम ४, २५ मुंबई पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

(३) नाही.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील सावली ब्रम्हपूरी, सिंदेवाही या तालुक्याती नागरिकाकडे आधार कार्ड नसल्याबाबत

**(४२) २३४१२ (१०-०८-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सावली ब्रम्हपूरी, सिंदेवाही या तालुक्यातील हजारो नागरिकाकडे आधार कार्ड नसल्यामुळे नागरिकांना शासनाच्या सोयी सवलती पासून वंचित राहावे लागत असल्याची माहिती दिनांक ५ जून, २०१५ रोजी निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावली, ब्रम्हपूरी, सिंदेवाही या तालुक्यातील हजारो नागरिकाकडे आधार कार्ड उपलब्ध होण्यासाठी शासनाकडून विशेष अभियान राबवून नागरिकांना आधार कार्ड उपलब्ध करून दिले आहेत काय वा करून देणार आहेत,
(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) आधार नोंदणीची कार्यवाही नियमित सुरु असून सर्व नागरिकांची आधार नोंदणी होईल याकरीता उचित दक्षता घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिखलदरा पर्यटन विकासासाठी (जि.अमरावती) अचलपूर-मूर्तीजापूर ही बंद होणारी रेल्वे गाडी सूरु करणेबाबत**

**(४३) २४०६४ (१२-०८-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील अचलपूर-मुर्तीजापूर ही बंद होणारी रेल्वे गाडी चिखलदरा पर्यटन विकासासाठी सुरु करण्याबाबतच्या ठरावास नगर परिषद, चिखलदरा यांनी मान्यता देवून दिनांक २६ ऑगस्ट, २०१३ च्या सुमारास शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१५) :** (१) प्रश्नाधिन ठराव शासनास सादर केलेला नाही. तथापि, चिखलदरा नगर परिषदेने सदर बाबतीत दिनांक २६/८/२०१३ ठराव क्र. ६ अन्वये सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता घेतली आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्र शासनाने बंदी घातलेल्या सीपीआय (एम) या नक्षलवादी संघटनेच्या दोघांना अटक केल्याबाबत**

**(४४) २४१०५ (१०-०८-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने बंदी घातलेल्या सीपीआय (एम) या नक्षलवादी संघटनेच्या दोघांना तळेगाव दाभाडे येथील तुकारामनगर परिसरातील मोरया हॉस्पिटल जवळून अटक केल्याची बाब माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित संशयिताला एक वर्षापासून तळेगावातील लोटस व्हिला या इमारतीत वास्तव्यास असून त्याची कोणतीही कल्पना पोलीसांना नव्हती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दहशतवाद्यांकडून माओवाद्यांना रसद पुरवली जात होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) व (४) लोटस व्हिला या इमारतीतील फ्लॅट मालक यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन तळेगाव येथे गु.र.क्र. १८/२०१५ कलम १८८ भा.दं.वि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच सी.पी.आय माओवादी व संघटनेचे सदस्यांविरुध्द दविप पोलीस ठाणे गु.र.क्र. ०७/२०१५ कलम ४१९, ४६७, ४६८, ४७१, २४ भा.दं.वि. सह कलम १०, १३, २०, ३८ बेकायदेशीर हालचाली (प्रतिबंध) अधिनियम, १९६७ सुधारित २००८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दहशवाद्यांकडून माओवाद्यांना रसद पुरविली जात होती किंवा कसे याबाबत तसेच गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात हायप्रोफाईल वेश्या व्यवसाय तेजीत सुरु असल्याबाबत**

**(४५) २४१२५ (१२-०८-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात अलीकडे वॉट्सॲप, फेसबुक आणि ऑनलाईन एस्कॉर्टच्या जाहिरातीच्या माध्यमातून हायप्रोफाईल वेश्या व्यवसाय तेजीत सुरु असल्याची बाब माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) पुणे शहर पोलीस विभागातील गुन्हे अन्वेषण विभागामध्ये खास सामाजिक सुरक्षा विभागाकडून या हायप्रोफाईल वेश्या व्यवसायाकडे कारवाई करण्यास दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,त्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतील गुन्हे शाखेअंतर्गत सामाजिक सुरक्षा विभागाकडून सन डिसेंबर, २०१४ अखेर अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ अन्वये ६० केसेस मध्ये एकूण ८७ स्त्री/पुरुषांना अटक करुन त्यांच्या ताब्यातून ११ अल्पवयीन व १०३ सज्ञान अशा एकूण ११४ मुलीची सुटका करण्यात आली आहे.

सन २०१५ जुलै अखेर २३ केसेस करण्यात आल्या असून त्यामध्ये एकूण ३० स्त्री/पुरुषांना अटक करुन त्यांच्या ताब्यातून ४ अल्पवयीन व ४१ सज्ञान अशा एकूण ४५ मुलीची सुटका करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विवधि विभागांतील भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये खटले दाखल करण्यासाठी पाठवलेले अंदाजे ३९४ प्रस्ताव परवानगी करीता शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(४६) २५०८३ (१२-०८-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भ्रष्टाचारी, बेहिशेबी मालमत्ता, नैतिक अध:पतन, खून, खूनाचा प्रयत्न, बलात्कार या व अशा गंभीर प्रकरणात गुन्हा दाखल झालेल्या गट अ व गट ब वर्गातील अधिकाऱ्यांच्या निलंबनाबाबत आढावा घेऊन पुढील निलंबन मागे घेणे किंवा पुढे चालू ठेवणे, पुर्न नियुक्ती इत्यादी कार्यवाहीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली निलंबन आढवा समिती गठीत करण्याचे निर्देश शासनामार्फत माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान प्रत्येक विभागाचे प्रधान सचिव, अप्पर मुख्य सचिवांना देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ९० दिवासांपेक्षा कमी कालावधी असलेले शासनाच्या परवानगीसाठी दाखल करण्यात आलेल्या प्रकरणाची संख्या २४६ असून सध्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने विवधि विभागांतील भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये खटले दाखल करण्यासाठी परवानगी करीता शासनाकडे पाठवलेले अंदाजे ३९४ प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१५) :** (१) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अंतर्गत अभियोग दाखल करण्यास विहित कालावधी मंजूरी देण्याबाबत तसेच गट-अ व गट - ब मधील राजपत्रित अधिकारी यांच्या बाबतीत प्रशासकीय विभाग स्तरावर निलंबन आढवा समिती गठण करुन अधिकाराचे प्रत्यायोजन करण्याबाबत शासन निर्णय सा.प्र.वि. दि.३१ जानेवारी, २०१५ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(२) व (३) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अंतर्गत सक्षम न्यायालयात अभियोग दाखल करण्यास संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर ३ महिन्यात अशी मंजूरी देण्याची / नाकारण्याची कार्यवाही करावी, असेही शासन निर्णय सा.प्र.वि. दि. ३१, जानेवारी, २०१५ अन्वये आदेशित करण्यात आले आहे. यासंदर्भातील प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभाग/ क्षेत्रिय कार्यालय प्रमुख यांचेकडील सक्षम प्राधिकारी यांचेकडे निर्यायासाठी सादर करण्यात येतात. यापैकी आजमितीस १०४ प्रकरणे तीन महिन्याहून अधिककाळ प्रलंबित असून त्याबाबत गृह विभागाकडून आढावा घेण्यात येत आहे.

---

**पुणे शहरात जैववैद्यकीय कचरा उचलण्यासाठी नोंदणी करणा-या क्लिनिक्सची संख्या २९०० असल्याची माहिती**

**(४७) २५४८४ (१७-१०-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात जवळपास पाच ते सात हजार दवाखाने (क्लिनिक) असताना पालिकेकडे जैववैद्यकीय कचरा उचलण्यासाठी नोंदणी करणा-या क्लिनिक्सची संख्या मात्र केवळ २९०० आहे हि माहिती माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही ठिकाणी डॉक्टरांकडून चक्क दारोदार फिरुन कचरा उचलणा-या कचरा वेचकांकडेच दवाखान्याचा कचरा सोपवला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील १ व २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पुणे महानगरपालिकेकडे जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाटीकरिता ज्या वैद्यकीय आस्थापनांनी नोंदणी केलेली नाही. अशा वैद्यकीय आस्थापनांचा पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयामार्फत सर्व्हे करण्यात येत असून त्या आस्थापनांना नोंदणी करणेकरिता प्रोत्साहित करण्यात येत आहे. तसेच त्यांच्या विविध वैद्यकीय संघटना (जनरल प्रॅक्टीशनर असोसिएशन, इंडियन मेडिकल असोसिएशन, पुणे शाखा) यांचे पदाधिका-यांसमवेत बैठका घेण्यात येत आहे. त्याअनुषंगाने वारंवार दैनिक वृत्त पत्रातून आवाहन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सेतू कार्यालय चालकाकडून सर्व सामान्य नागरिकांन कडून होत पैशाची मागणी**

**(४८) ३२४१४ (१८-०१-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा तालुक्यात सर्वसामान्य जनतेला सेतूचालक वेठीस धरुन दाखल्याचा नावाखाली लोकांकडून हजारो रुपयांची मागणी करण्यात येत असल्याची बाब सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास दाखला तयार झाला की नोंदणी करण्यापासून दाखला परिपूर्ण होईपर्यत सर्व ठिकाणी पैसे दयावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास राज्यातील सर्वच सेतू कार्यालयामध्ये सर्रास लोकांची खुलेआम पैशाची मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने लाचखोरीला आळा घालण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. या संबंधी जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्याकडून अहवाल प्राप्त झालेला आहे.
(४) महा-ई सेवा केंद्रातून मिळणारी प्रमाणपत्रे/दाखल्याची यादी, त्यावर आकारणेत येणारी फी, लागणारा कालावधी याबाबतचे फलक महा-ई सेवा केंद्राबाहेर दर्शनी भागात लावण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यात मध्यप्रदेशातून वाहनधारक गावठी कट्टे आणून तस्करी करीत असल्याबाबत**

**(४९) ३३०४२ (२१-०१-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यात मध्यप्रदेशातून वाहनधारक गावठी कट्टे आणून तस्करी करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार तस्करीला प्रतिबंध करणेबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपुर शहरातील अनिवासी भारतीय भागीदारांची लेगाटो हेअर ॲण्ड स्किन कंपनीचे मालक श्री. अनिल आदमने यांनी फसवणूक केल्याबाबत**

**(५०) ३६३५१ (२१-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपुर शहरातील लेगाटो हेअर ॲण्ड स्किन कंपनीचे मालक श्री. अनिल आदमने यांनी अनिवासी भारतीय भागीदारांची दोन कोटी पाच लाख रुपयांची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.चेतन जयंतीलाल शाह आणि शेफाली शाह यांनी या संबंधाने पोलीस विभागात केलेल्या तक्रारीनुसार झालेल्या फसवणुकीची पोलीस खात्यामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०३-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, चौकशीत फिर्यादिने केलेल्या तक्रारीनुसार आरोपी श्री. अनिल आदमने यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन सदर, नागपूर येथे अपराध क्र. २८०/२०१५ भा.दं.वि कलम ४०६,४०९,४२०,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अरोपीस अटक करण्यात आली असून सध्या न्यायालयाचे आदेशानुसार जामिन मिळालेला आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.